

## । उत्पातनाशन गणेश स्तोत्र ।

गणेश हे दैवत सर्व अडथळ्यांचा नाश करणारे आणि भक्तांना शुभ फल प्रदान करणारे आहे, हा महिमा असंख्य ग्रंथ आणि पुराणांमध्ये वर्णन केला आहे. त्यापैकी एक म्हणजे श्री गणेश पुराणामध्ये वर्णन केलेले उत्पातनाशन गणेश स्तोत्र. हे स्तोत्र गणेश पुराणाच्या क्रीडाखंडाच्या बालचरित या भागात अंतर्भूत आहे. या स्तोत्राचे नियमित श्रवण आणि पठण केल्याने आनंद, समृद्धी, सौभाग्य व मनाला शांती आणि सकारात्मक ऊर्जा मिळते आणि जीवनातील अडथळ्यांचा नाश होतो, तसेच तीन प्रकारच्या दुःखांपासून मुक्ती मिळते अशी भाविकांची श्रद्धा आहे.

या स्तोत्राची रचना अनुष्टुप छंदात असून अकरावा श्लोक इन्द्रवज्रा/उपेन्द्रवज्रा (गण-ततजगग/जतजगग) वृत्तात आहे. ते म्हणण्यास व समजण्यासही अत्यंत सोपे आहे.
खाली उद्धृत पहिल्या श्लोकाच्या पहिल्या चरणात व आधीच्या श्लोकांमध्ये काशीराज,ऋषी,लोकपाल आणि इतर जनांनी भक्तिपूर्वक गजाननाची स्तुती केलेली आहे. म्हणून ते गाळून येथे दुस-या चरणापासून सुरुवात केली आहे.

नाथस्त्वमसि देवानां मनुष्योरगरक्षसाम् ॥१॥

मराठी- तू देव, मानव, सर्प, दैत्य यांचा स्वामी आहेस.

यक्षगन्धर्वविप्राणां गजाश्वरथपक्षिणाम् ।
भूतभव्यभविष्यस्य बुद्धीन्द्रियगणस्यच ॥२॥

मराठी- (तसेच) यक्ष, गंधर्व, ब्राह्मण, हत्ती, घोडे, रथ, पक्षी, जे घडून गेले आहे, घडत आहे व घडणार आहे त्याचा, बुद्धि, विविध इंद्रिये (यांचाही स्वामी आहेस)

हर्षस्य शोकदुःखस्य सुखस्य ज्ञानमोहयोः ।
अर्थस्य कार्यजातस्य लाभहान्योस्तथैव च ॥३॥

मराठी- त्याचप्रमाणे आनंद, विलाप, दुःख, सुख, ज्ञान, आसक्ती, सर्व तऱ्हेच्या कामांमधून होणारी अर्थप्राप्ती, नफा, तोटा, (यांचाही स्वामी आहेस).

स्वर्गपाताललोकानां पृथिव्या जलधेरपि ।
नक्षत्राणां ग्रहाणां च पिशाचानां च वीरुधाम् ॥४॥

मराठी- स्वर्ग आणि पाताळ इत्यादी लोक, पृथ्वी, समुद्र, तारका, ग्रह, भुतें, वनस्पती (यांचाही स्वामी आहेस).

वृक्षाणां सरितां पुंसां स्त्रीणां बालजनस्य च ।
उत्पत्तिस्थितिसंहारकारिणे ते नमो नमः ॥५॥

मराठी- झाडे, नद्या, पुरुष, महिला आणि मुले यांचा (स्वामी आहेस). (जगाची) निर्मिती, राखण आणि नाश करणाऱ्या तुला माझा पुनः पुनः नमस्कार.

स्वामी आहेस तू देवां सर्प मानव राक्षसां ।
ब्राह्मणां यक्ष गंधर्वां, हत्ती घोडे द्विजां तसा ॥ ०१ (द्विज- पक्षी)
काल आज उद्या जे त्यां, गात्रे सारी मती तशी ।
राजा मोद सुखा दुःखा विलाप गम वा खुशी ॥ ०२
ज्ञान आसक्ति वा प्राप्ती, धनाचा लाभ, वा क्षती । (क्षती- हानी)

महासागर पाताळे सुरलोक तशी क्षिती ॥ ०३ (क्षिती- पृथ्वी)
भुतें तारे ग्रहां तेवी झुडुपां तोच राखतो
नर नारी नद्या झाडे बालकांसहि पाळतो ॥ ०४
निर्मुनी पोषिणे विश्वा, संहार करणे जया ।
विनायका तुझ्या हाती, प्रणाम मम हे तया ॥ ०५

पशूनां पतये तुभ्यं तत्त्वज्ञानप्रदायिने ।
नमो विष्णुस्वरूपाय नमस्ते रुद्ररूपिणे ॥६॥

मराठी- हे खरे ज्ञान देणा-या, प्राणीमात्रांच्या स्वामी, तुला नमस्कार असो. विष्णू आणि रुद्र दोन्ही रूपात असलेल्या, तुला माझा नमस्कार असो.

प्राणिमात्रांस स्वामी तू, ज्ञान देसी खरे सदा ।
विष्णूचे रूप रुद्राचे, प्रणाम तुज सर्वदा ॥ ०६

नमस्ते ब्रह्मरूपाय नमोऽनन्तस्वरूपिणे ।
मोक्षहेतो नमस्तुभ्यं नमो विघ्नहराय ते ॥७॥

मराठी- ब्रह्म स्वरूप असलेल्या तुला नमस्कार. अनंत स्वरूप असणाऱ्या तुला नमस्कार. मुक्तीचे साधन असलेल्या तुला नमस्कार. अडथळयांचा नाश करणाऱ्या तुला नमस्कार.

अनंता ब्रह्मरूपाला वंदितो मुक्तिसाधना ।
अवरोधां करी दूर, नमितो मी पुन्हापुन्हा ॥ ०७

नमोऽभक्तविनाशाय नमो भक्तप्रियाय च ।
अधिदैवाधिभूतात्मन् तापत्रयहराय ते ॥८॥

मराठी- जे तुझे भक्त नाहीत त्यांचा नाश करणाऱ्या तुला नमस्कार आणि भक्तांचे प्रिय करणा-या (भक्तांना हवे ते देणाऱ्या) व आध्यात्मिक, अधिदैविक व अधिभौतिक असे तीनही त्रास दूर करणाऱ्या तुला नमस्कार.

थारा न दे अभक्तांना, भक्तांचे प्रिय जो करी ।
तीन त्रास दुरी सारी, नमस्कार परोपरी ॥ ०८

टीप- तापत्रय म्हणजे जीवनातील दुःख किंवा वेदनांचे तीन मुख्य स्रोत - आध्यात्मिक (अंतर्गत कारणे), अधिभौतिक (शारीरिक किंवा बाह्य कारणे) आणि अधिदैविक (अलौकिक किंवा भाग्याशी संबंधित कारणे).
ही दुःखे शारीरिक, मानसिक आणि नशिबामुळे निर्माण होणाऱ्या अडचणींचे रूप घेऊ शकतात, ज्यामुळे या जगात मानव दुःखी होतो.

सर्वोत्पातविघाताय नमो लीलास्वरूपिणे ।
सर्वान्तर्यामिणे तुभ्यं सर्वाध्यक्षाय ते नमः ॥९॥

मराठी- सर्व आपत्तींचे निवारण करणाऱ्या तुला नमस्कार असो. चमत्कार स्वरूप असलेल्या तुला नमस्कार असो. सर्वांच्या अंतरी वास करणा-या तुला नमस्कार असो. सर्वांवर राज्य करणाऱ्या तुला नमस्कार असो.

निवारी संकटे सारी, क्रीडा साक्षात, अंतरी ।
सर्वांच्या, सर्वमुख्याते, नमस्कार परोपरी ॥ ०९

अदित्या जठरोत्पन्न विनायक नमोऽस्तु ते ।
परब्रह्मस्वरूपाय नमः कश्यपसूनवे ॥१०॥

मराठी- अदितीच्या गर्भातून जन्मलेल्या हे विनायका, तुला नमस्कार असो. परम ब्रह्माचा अवतार असलेल्या कश्यपाच्या पुत्रा, तुला नमस्कार असो.

मुलगा कश्यपाचा तू अदितीपोटि जन्मला ।
परब्रह्म अवतारा, प्रणाम मम हा तुला ॥ १०

टीप- वडील कश्यप प्रजापती आणि आई अदिती यांचा पुत्र दशभुज महोत्कट विनायक हा भगवान श्री गणेशाच्या ६४ अवतारांपैकी पहिला अवतार. नरांतक आणि देवांतक नावाच्या दोन राक्षस भावांच्या नाशासाठी हा अवतार होता. नऊ हातांमध्ये शस्त्रे आणि दहाव्या हाताने आशीर्वाद देणारे त्याचे रूप आहे.

अमेयमायान्वितविक्रमाय मायाविने मायिकमोहनाय ।
अमेयमायाहरणाय माया-महाश्रयायास्तु नमो नमस्ते ॥ ११॥

मराठी- ज्याने आपल्या अफाट (ईश्वरी) शक्तीने पराक्रम केले आहेत, जो (स्वतः) मायास्वरूप असून मायावी जनांना मोहित करतो, जो अपरिमित गारुडाचा नाश करतो, जो महामायेचे आश्रयस्थान आहे, अशा गणेशा तुला पुन्हा पुन्हा नमस्कार.

**पराक्रमी, ताकद फार, मायास्वरूप मोही जनमानसाला ।**
**गारूड नाशी, नि महान माये थारा, नमस्कार विनायकाला ॥ ११**

**य इदं पठति स्तोत्रं त्रिसंध्योत्पातनाशनम् ।**
**न भवन्ति महोत्पाता विघ्ना भूतभयानि च ॥१२॥**

**मराठी- सर्व संकटांचा नाश करणाऱ्या या स्तोत्राचे पठण जो (रोज) त्रिकाळ करतो, त्याला महान संकटे, अडथळे येत नाहीत, भुतांपासून भयही रहात नाही.**

**तीन काळ म्हणे स्तोत्रा नाश उत्पात कारणा ।**
**विघ्ने न संकटे येती, भूतभीती न ये मना ॥ १२**

**त्रिसंध्यं यः पठेत् स्तोत्रं सर्वान् कामानवाप्नुयात् ।**
**विनायकः सदा तस्य रक्षणं कुरुतेऽनघ ॥१३॥**

**मराठी- हे पुण्यवंता, हे स्तोत्र जो त्रिकाल पठण करील, त्याच्या सर्व इच्छा पूर्ण होतील, आणि विनायक त्याचे नित्य रक्षण करतो.**

**पुण्यवंता, स्तोत्र गाई तीनदां सर्व लाभण्या ।**
**विनायक तया आहे नित्य संपूर्ण रक्षिण्या ॥ १३**

॥ इति श्रीगणेशपुराणे उत्पातनाशनगणेशस्तोत्रं सम्पूर्णम् ॥

****************

धनंजय बोरकर (९८३३०७७०९१)

https://www.facebook.com/search/top?q=स्तोत्र%20मंजूषा%20-%20stotra%20manjusha
www.stotramanjusha.com

अशा अनेक संस्कृत स्तोत्रांचे गद्य व पद्य अनुवाद (एकूण ६० स्तोत्रे) माझ्या ‘ स्तोत्र मंजूषा ’ या पुस्तकात समाविष्ट आहेत. या क्षेत्रात रस असणा-यांनी अवश्य संपर्क साधावा.